कलन - ३	
दस्त क्र. ३०(९	२०१७
५२	६९

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/डोंवि/२०१२-१३/९९/७५

कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण

दिनांक :- २७/४/२०१६

सुधारीत बांधकाम मंजुरी.
(इ.नि.इ. क्षेत्र:-७०६३.८७ चौ.मी.)
श्री/श्रीमती-- विष्णु के.चौधरी व इतर.
कुमुखधारक श्री.साई बालाजी एंटरप्रायझेस् तर्फे श्री.संजय सिंग.
द्वारा--वास्तुशिल्पकार, श्री. प्रदीप कांबळे, डोंबिवली (पु.)
स्ट्रक्चरल इंजिनिअर:--श्री.अरविंद पटेल, डोंबिवली पुर्व.

विषय:-- स.नं. १२८ जुना १० नवीन हि.नं. ४अ/४ब,२ मौजे--कांचनगाव , डोंबिवली (पु.). स.नं. २४२अ जुना २८ नवीन हि.नं. १/१ पैकी मौजे:--चोळे, डोंबिवली पुर्व. येथे बांधकाम करणेच्या मंजुरीबाबत.

संदर्भ.-- १) आपला दि.१८-०४-२०१६ रोजीचा श्री.प्रदीप कांबळे, डोंबिवली पुर्व. वास्तुशिल्पकार यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र. ११५५०
२) सुधारीत बांधकाम मंजुरी जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/डोंवि/२०१२-१३/९९/३१५, दि २०.०१.२०१५
३) भाग बांधकाम पुर्णत्वाचा दाखला मंजुर जा.क्र.कडोंमपा/नरवि/सीसी/डोंवि/१२०, दि.११.०९.२०१५

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार स.नं. १२८ जुना १० नवीन हि.नं. ४अ/४ब,२ मौजे--कांचनगाव, डोंबिवली (पु.). स.नं. २४२अ, जुना २८, नवीन हि.नं. १/१ पैकी मौजे:--चोळे, डोंबिवली पुर्व. (पु.) मध्ये १३६६०.०० चौ.मी. क्षेत्रावर ११८५४.२७ चौ.मी. चटई क्षेत्रासाठी संदर्भ क्र.२ अन्वये सुधारीत बांधकाम मंजुरी प्रदान केलेली असुन संदर्भ क्र.३ अन्वये भाग बांधकाम पुर्णत्वाचा दाखला ५,४८१.०५ चौ.मी. पर्यंत प्रदान करण्यात आलेला असुन विकासकाने आता हस्तांतरणीय विकास हक्क (प्रस्तावित ७०६३.८७ चौ.मी.साठी) व विना अधिमुल्याची ... करून एकुण १८९४८.०४ चौ.मी. पर्यंत क्षेत्राच्या पुढीलप्रमाणे विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक १८-०४-२०१६ च्या अर्जास अनुसरून पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत ... पुढील प्रमाणे नमुद कार्यक्षेत्रात ... व तळमजला ... वरील बांधकामाबाबत, सुधारीत बांधकाम मंजुरी प्रदान देण्यात येत आहे इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी आपण जबाबदार राहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

म.सहाय्यक संचालक नगररचना,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण

१) हे सुधारीत बांधकाम मंजुरी प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजुरीपत्राचे नुतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरूस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
४) ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.
५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.
६) जोत्यापर्यंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बाहेरभिंतीचे व जोत्याचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे, व ते या कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पुर्णत्वाचा दाखला" घेण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.
७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये, तसे केल्याचे आढळून आल्यास संदर्भीय बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल
इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल
९) नकाशांत दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करू नये तसेच प्लॉटच्या हद्दीत इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करू नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये.
१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.
११) भूखंडाकडे जाण्यायेण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल.बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे जाण्याच्या येण्याच्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.
१२) जागेत जुने भाडेकरू असल्यास त्यांच्याबाबत योग्य ती व्यवस्था करण्याची जबाबदारी मालकांची राहिल व मालक-भाडेकरू यामध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण मालकाने करणे आवश्यक राहिल..

SUB-REGISTRAR